**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./विधी/३१६/2022-23
दिनांक : 17/02/2023

## जाहीर सुचना

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर वकील व सिनियर काउंसिल यांची
तीन वर्षांकरीता नव्याने नेमणूक करणेबाबत

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयीन कामकाज करणे करीता खालीलप्रमाणे मा.न्यायालय / न्यायाधिकरणनिहाय वकील व सिनियर काउंसिल (वरिष्ठ विधिज्ञ) यांची महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर तीन वर्षांकरीता नव्याने नेमणूक करावयाची आहे;

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | आवश्यक संख्या वकील / वरिष्ठ विधिज्ञ |
|---|---|---|
| १. | मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली | वकील – ०२ |
| २. | मा.उच्च न्यायालय, मुंबई | वरिष्ठ विधिज्ञ– ०२ |
| ३. | मा.उच्च न्यायालय, मुंबई | वकील – ०३ |
| ४. | NCLT (National Company Law Tribunal) | वकील – ०१ |
| ५. | मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय, वसई | वकील – ०५ |

त्यादृष्टीने इच्छुक वकील/वरिष्ठ विधिज्ञ/वकील संस्था यांचेकडून वसई-विरार शहर महानगरपालिका, विधी विभाग मुख्यालय, प्रभाग समिती 'सी' बहुद्देशीय इमारत, चौथा मजला, विरार (पु), ता.वसई, जि.पालघर, पिन कोड-४०१३०५ येथे दिनांक ०८/०३/२०२३ सायं.०४:०० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळता) विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण तपशिल व कागदपत्रांसहित मागविणेत येत आहेत. विलंबाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घेणेत यावी.

महानगरपालिकेच्या वतीने करावयाचे न्यायालयीन कामकाजासाठी ठरविलेले दर, अटी-शर्ती व अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या http://vvcmc.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक वकील/वरिष्ठ विधिज्ञ/वकील संस्था यांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सदर दरसूची, अटी-शर्ती व अर्जाचा नमुना यांची प्रिंटआउट काढुन सदर अर्ज, दरसूची व अटी-शर्ती मान्य असलेबाबत स्वाक्षरी करून अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

वकिलांच्या पॅनलच्या नियुक्तीबाबत मा.आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

जावक क्र.वविशम/विधी/३१६/२०२२-२३
दिनांक:- १७/०२/२०२३

सही/-
उप-आयुक्त (विधी)
वसई-विरार शहर महानगरपालिका

## <u>शैक्षणिक अहर्ता व कामाचा अनुभव</u>

१. अभियोक्ता मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा.

२. अभियोक्ता बार कौंसिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चा सनदधारक असावा.

३. अभियोक्त्यास १० वर्षांपेक्षा जास्त स्वतंत्र न्यायालयीन कामाचा अनुभव असावा.

४. अभियोक्त्यास फौजदारी व दिवाणी न्यायालयाच्या कार्यपद्धतीचे उत्तम ज्ञान व अनुभव असणे आवश्यक आहे.

५. अभियोक्त्यास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. अभियोक्त्यास कामगार कायदा; महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९; महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६; गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग निवड प्रतिबंध) अधिनियम, १९९४; वैद्यकीय गर्भसमाप्ती अधिनियम, १९७१; बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायदा, १९४९; भूसंपादन कायदा; बायो मेडिकल वेस्ट मॅनेजमेंट ॲक्ट, १९९८; महाराष्ट्र पोलूशन कंट्रोल बोर्ड ॲक्ट; पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६; महाराष्ट्र (शहरी भाग) वृक्षांचे संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५; लवाद व समेट अधिनियम, १९९६; अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४; ग्राहक संरक्षण अधिनियम; महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम व महानगर्पलीकेशी संबंधित इतर कायद्यांचे व नियमांचे उत्तम ज्ञान व सदर बाबतीत कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

## <u>पॅनलवरील वकीलांना कराव्या लागणाऱ्या कामासंदर्भातील अटी व शर्ती</u>

१.पॅनलवरील वकीलांना महानगरपालिकेच्या वतीने वा महानगरपालिकेविरुद्ध न्यायालयामध्ये दाखल करणेत आलेल्या दाव्यांचे, फौजदारी केसेस, अपिले यामध्ये महानगरपालिकेतर्फे कामकाज पाहणे.

२.विहित मुदतीत मुदतीत महानगरपालिकेतर्फे दाखल दावा अथवा केसेसमध्ये वकीलपत्र, लेखी कैफियत, जबाब, प्रतिज्ञापत्र, कॅव्हेट दाखल करणे.

३. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकीलांना वर्ग करणेत आलेली प्रकरणे/दावे/खटले त्यांनी स्वतः चालवायचे आहेत. सदर प्रकरणे/दावे/खटले त्यांना अन्य वकीलांना परस्पर वर्ग करता येणार नाही.

४. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रकरणांवर विधीमत देणे.

५. न्यायालयीन प्रकरणांच्या व्यतिरिक्त करार, निविदा इ.बाबत मसुदालेखन करणे.

६. मा.न्यायालयात महानगरपालिके संबंधित दाखल प्रकरणे/दावे/खटले यांसंदर्भात पॅनलवरील वकीलांनी अतिशय गोपनियता बाळगणे आवश्यक आहे.

७. वसई-विरार शहर महानगरपालिकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे पॅनलवरील वकीलांना बंधनकारक राहील.

८. ज्या दाव्यांमध्ये महानगरपालिकेच्या वतीने वकील म्हणून काम पाहत आहेत किंवा सल्ला देत आहेत अशा दाव्यातील अन्य पक्षकारास त्यांना सल्ला देता येणार नाही, अथवा अशा पक्षकाराची महानगरपालिकेविरुद्ध असलेली प्रकरणे/दावे/खटले स्विकारता येणार नाही.

९. महानगरपालिकेच्या पॅनलवरील वकीलांना वर्ग केलेल्या दाव्यांमध्ये पारित झालेले अंतरिम आदेश/निर्णय/हुकुम/सद्यस्थिती हे वेळोवेळी महानगरपालिकेच्या विधी विभागास कळविणे बंधनकारक राहील, तसेच दाव्यातील अंतरिम आदेश, स्थगिती आदेश, निर्णय/हुकुम, सद्यस्थिती व इतर कागदपत्रे विधी विभागास वेळोवेळी उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

१०. महानगरपालिकेतर्फे वर्ग करणेत आलेल्या दाव्यांची सद्यस्थिती (सुनावणीच्या तारखा तसेच आदेश पारित असल्यास) प्रत्येक महिन्याच्या शेवटी अहवाल स्वरूपी विधी विभागास उपलब्ध करून देणे.

११. महानगरपालिकेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकीलांची नेमणूक प्रारंभिक काळ तीन वर्षांकरिता असेल आणि त्यांना वर्ग करणेत आलेल्या प्रकरणे/दावे/खटले मधील समाधानकारक कामगिरी असेल तर त्यांचा पुढील कालावधी वाढविणेबाबत विचारात घेण्यात येईल.

१२.पॅनलवरील वकीलांना वर्ग करणेत आलेल्या प्रकरणे/दावे/खटले मधील त्यांच्या कामगिरीनुसार त्यांची नेमणूक कोणत्याही वेळेस संपुष्टात येण्यास पात्र राहील व याबाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

१३. पॅनलवरील वकीलांनी महानगरपालिकेच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा निकाल लवकरात लवकर लागणेसाठी आवश्यक पूर्ण प्रयत्न करणे तसेच विहित कालावधीत महानगरपालिकेची बाजू वेळीच व पूर्ण सामर्थ्याने मांडून महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लागण्यासाठी प्रयत्न करणे बंधनकारक राहील. दाव्यासंबंधी साप्ताहिक अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

१४. पॅनलवरील वकीलांना वर्ग करणेत आलेली प्रकरणे/कामे ही त्यांना उचित/योग्य कारणाव्यतिरिक्त नाकारता येणार नाहीत. वकीलांना वर्ग करणेत आलेले काम उचित/योग्य कारणास्तव करण्याचे नाकारल्यास सदर वकीलाची पॅनलवरील नेमणूक रद्द होणेस पात्र राहील.

१५. पॅनलवरील वकीलांना महानगरपालिकेने मंजूर केलेले व्यवसायिक शुल्काचे दर हे सर्व शासकीय करांसहीत असून प्रचलित शासन धोरणानुसार वजावटीस पात्र राहतील.

१६. पॅनलवरील वकीलांना त्यांच्या व्यवसायिक शुल्काची देयके महानगरपालिकेतर्फे मंजूर दरानुसार अदा करण्यात येतील.

१७. पॅनलवरील वकीलांनीव्यवसायिक शुल्काच्या देयाकासोबत दाव्यातील रोजनामा, वकालतनामा, नेमणूक आदेश, कॅव्हेट प्रत, प्रतिज्ञापत्र व वेळोवेळी झालेल्या न्यायालयीन आदेशाच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक राहील.

१८. न्यायालयात महानगरपालिकेतर्फे दावा अथवा न्यायालयात दाखल करणार असलेल्या लेखी कैफियत, जबाब, प्रतिज्ञापत्र यांचा मसुदा दाखल करावयाच्या तारखेच्या किमान पाच दिवस अगोदर कळविणे आवश्यक राहील.

१९.पॅनलवरील वकीलांनी त्यांची नेमणूकसंपुष्टात आल्यास/रद्द झाल्यास त्यांना वर्ग करण्यात आलेली महानगरपालिकेची प्रकरणे/दावे/खटले/याचिका व संबंधित दस्तऐवज तातडीने महानगरपालिकेस सुपूर्द करणे बंधनकारक राहील.

२०. पॅनलवरील वकीलांनी न्यायप्रविष्ठ दाव्यासंदर्भात महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या प्रयत्नांची शहानिशा व विश्लेषणाबाबत निर्णय घेणेस पुढील अधिकार मा.आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांस राहतील.

२१. पॅनल वकीलांनी महानगरपालिकेसंबंधित दावे/याचिका/खटले हाताळणेकरीता महानगरपालिकेने तयार केलेली VVCMC-LMS वविशम खटला व्यवस्थापन प्रणाली या संगणक आज्ञावलीचा वापर करून माहिती अद्यावत करणे आवश्यक राहील.

२२. पॅनलसाठी निविदा प्रक्रियेत रितसर सहभागी होणाऱ्या वकीलांचाच पॅनलसाठी विचार करणेत येईल.

सही/-

उप-आयुक्त (विधी)

वसई-विरार शहर महानगरपालिका

वरील ........................................................................ न्यायालयातील न्यायालयीन कामकाजाचे दर व अटी शर्ती मान्य असून त्याप्रमाणे मी काम करणेस तयार आहे.

(वकीलाचे / संस्थेचे नांव सही व शिक्का )

# वसई-विरार शहर महानगरपालिका

## विधी विभाग

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर आवश्यकतेप्रमाणे वकील व सिनियर काऊंसिल यांची तीन वर्षांकरीता नव्याने नेमणूक करणेबाबत तसेच वकील व सिनियर काऊंसिल यांना न्यायालय / न्यायाधिकरण निहाय मंजूर असलेले दर खालीलप्रमाणे आहेत;

## मा.उच्च न्यायालय, मुंबई

| अ. क्र. | दाव्यांचे प्रकार / कामाचे टप्पे | मंजूर दर (रुपये) | |
|---|---|---|---|
| १. | महानगरपालिकेविरुद्ध याचिका/अपील/जनहित याचिका मध्ये शपथपत्र दाखल झाल्यानंतर ६०% रक्कम | ६०% रक्कम | एकूण रक्कम रुपये |
| | कनिष्ठ वकील | ९,०००/- | १५,०००/- |
| | वरीष्ठ वकील | १५,०००/- | २५,०००/- |
| | सिनियर काऊंसिल<br>(एखाद्या प्रकरणाच्या गांभिर्याप्रमाणे दरामध्ये वाटाघाटी करून चढ-उतार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखीव असतील) | | १,००,०००/- |
| | महानगरपालिकेविरुद्ध याचिका/अपील/जनहित याचिका मध्ये अंतिम निर्णयानंतर ४०% रक्कम | ४०% रक्कम | |
| | कनिष्ठ वकील | ६,०००/- | |
| | वरीष्ठ वकील | १०,०००/- | |
| २. | महानगरपालिकेच्या वतीने याचिका/अपील दाखल झाल्यानंतर ५०% रक्कम | ५०% रक्कम | एकूण रक्कम रुपये |
| | कनिष्ठ वकील | १०,०००/- | २०,०००/- |
| | वरीष्ठ वकील | १५,०००/- | ३०,०००/- |
| | सिनियर काऊंसिल<br>(एखाद्या प्रकरणाच्या गांभिर्याप्रमाणे दरामध्ये वाटाघाटी करून चढ-उतार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखीव असतील) | | १,००,०००/- |
| | याचिकेतील/अपीलातील अंतिम निर्णयानंतर साक्षांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर ५०% रक्कम<br>(सदर याचिका/अपील दाखल करणेकरीता Processing Fee/भरावी लागणारी कोर्ट फी ची रक्कम महानगरपालिकेने भरणा करावी) | ५०% रक्कम | |
| | कनिष्ठ वकील | १०,०००/- | |
| | वरीष्ठ वकील | १५,०००/- | |
| ३. | महानगरपालिकेमार्फत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केल्यास अंतिम निर्णयानंतर | | एकूण रक्कम रुपये<br>१०,०००/- |
| ४. | महानगरपालिकेविरुद्ध दाखल होणारे सिव्हील ॲप्लीकेशन (For Interim Relief) | | एकूण रक्कम रुपये<br>५,०००/- |
| ५. | न्यायालयीन प्रकरणांमध्ये साक्षांकित प्रती काढणेकरीता | | एकूण रक्कम रुपये<br>१,०००/- |
| ६. | केव्हॅट (Caveat) दाखल करणेकरीता | | एकूण रक्कम रुपये<br>५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | लीगल नोटीस तयार करून बजावणेकरीता | | एकूण रक्कम रुपये ३,०००/- |
| ८. | साधी मायनर नोटीस तयार करून बजावणेकरीता | | एकूण रक्कम रुपये २,०००/- |
| ९. | अभिप्राय व कायदेशीर सल्ला देणेकरीता | | एकूण रक्कम रुपये ५,०००/- |
| १०. | नगररचना विभागाशी संबंधित बांधकाम परवानगी विषयी सल्ला (O.C., C.C., R.D.T., T.D.R.) | | एकूण रक्कम रुपये ५,०००/- |
| ११. | **करारनामा**<br>१. करारानुसार मसुदा तयार करून देणेकरीता<br>२.कराराचे परीक्षण करून देणेकरीता | | एकूण रक्कम रुपये<br>५,०००/-<br>३,०००/- |
| १२. | मा.सर्वोच्च न्यायालय | | वरिष्ठ वकीलांनी दिलेल्या बिलानुसार |

## मा.कामगार न्यायालय

| अ. क्र. | दाव्यांचे प्रकार / कामाचे टप्पे | मंजूर दर (रुपये) |
|---|---|---|
| १. | केव्हॅट (Caveat) दाखल करणेकरीता | एकूण रक्कम रुपये २,०००/- |
| २. | न्यायालयीन दावे | एकूण रक्कम रुपये ८,०००/- |

## मा.औद्योगिक न्यायालय

| अ. क्र. | दाव्यांचे प्रकार / कामाचे टप्पे | मंजूर दर (रुपये) |
|---|---|---|
| १. | केव्हॅट (Caveat) दाखल करणेकरीता | एकूण रक्कम रुपये २,०००/- |
| २. | न्यायालयीन दावे | एकूण रक्कम रुपये ८,०००/- |

## मा.न्यायाधिकरण / मा.आयोग

| अ. क्र. | दाव्यांचे प्रकार | कामाचे टप्पे | मंजूर दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | Slum Tribunal | निकाल लागलेनंतर देय | १५,०००/- |
| २. | Consumer Disputes Redressal Comission | निकाल लागलेनंतर देय | १५,०००/- |
| ३. | Human Rights Commission | निकाल लागलेनंतर देय | १५,०००/- |
| ४. | MACT (Motor Accidents Claims Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | १५,०००/- |

## मा.न्यायाधिकरणे (TRIBUNALS)

| अ. क्र. | दाव्यांचे प्रकार | कामाचे टप्पे | मंजूर दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | NGT (National Green Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | २५,०००/- |
| २. | NCLT (National Company Law Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | २५,०००/- |
| ३. | MAT (Maharashtra Administrative Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | १५,०००/- |

## मा.लवाद न्यायाधिकरण (ARBITRATION TRIBUNAL)

| अ. क्र. | कामाचे टप्पे | मंजूर दर (रुपये) |
|---|---|---|
| १. | महानगरपालिकेच्या वतीने शपथपत्र/प्रतिज्ञापत्र/लेखी जबाब/पुरावे/दस्तऐवज इत्यादी दाखल करणेकरीता | एकूण रक्कम रुपये १५,०००/- |
| २. | प्रत्येक सुनावणीस हजर राहणेकरीता | एकूण रक्कम रुपये १५,०००/- |

## मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय, वसई

| अ. क्र. | दाव्याचा प्रकार | दाव्याचा टप्पा | टप्पानिहाय अदा करावयाची फी (रुपये) | दाव्या बद्दलची एकूण फी (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | वसई दिवाणी न्यायालयात मनपाविरुद्ध दाखल दावे | १. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) | २,०००/- | एकूण रक्कम १२,०००/- |
| | | २. लेखी विधान दाखल करणे (Filling of W.S.) | २,०००/- | |
| | | ३. निशाणी ५ युक्तिवाद व आदेश (Exhibit 5 argument followed by Order) | १,५००/- | |
| | | ४. सुनावणी (Hearing) | ४,५००/- | |
| | | ५. अंतिम युक्तिवाद व आदेश/निर्णय/हुकुम (Final argument followed by order/ judgment / decree) | २,०००/- | |
| २. | वसई जिल्हा न्यायालयात मनपाच्या वतीने किंवा मनपाच्या विरुद्ध अपील दाखल झाल्यास | १. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) | ४,०००/- | एकूण रक्कम १०,०००/- |
| | | २. अंतिम युक्तिवाद व आदेश/निर्णय/हुकुम (Final argument followed by order/ judgment / decree) | ६,०००/- | |
| ३. | दिवाणी न्यायालयात अपील | | | एकूण रक्कम ८,०००/- |
| ४. | निवडणूक दावे | | | एकूण रक्कम ८,०००/- |
| ५. | मोटार अपघात दावे | | | एकूण रक्कम ८,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | न्यायालयीन आदेशाच्या अंमलबजावणी संबंधित दावे | | | एकूण रक्कम ८,०००/- |
| ७. | केव्हॅट (Caveat) दाखल करणेकरीता | | | एकूण रक्कम २,०००/- |
| ८. | फौजदारी खटले<br>1. Summons Case<br>2. Warrant Case<br>3. Summery Case | १. वकालतनामा दाखल करणे (Filling of VP) | २,०००/- | एकूण रक्कम १०,०००/- |
| | | २. प्रतिवादीने केलेले बचावाचे विधान (Plea/Charge) | २,०००/- | |
| | | ३. सुनावणी (Hearing) | २,०००/- | |
| | | ४. अंतिम युक्तिवाद (Final argument) | २,०००/- | |
| | | ५. निर्णय (judgment) | २,०००/- | |
| ९. | Miscellaneous Applications (Civil/Criminal) | १. वकालतनामा दाखल करणे / अर्ज (Filling of VP / Application) | ३,०००/- | एकूण रक्कम ६,०००/- |
| | | २. युक्तिवाद व आदेश (Argument followed by Order) | ३,०००/- | |
| १०. | नगररचना विभागाशी संबंधित बांधकाम परवानगी विषयी सल्ला (O.C., C.C., R.D.T., T.D.R.) | | | एकूण रक्कम ३,०००/- |
| ११. | **करारनामा**<br>१. करारानुसार मसुदा तयार करून देणेकरीता<br>२.कराराचे परीक्षण करून देणेकरीता | | | एकूण रक्कम ३,०००/-<br>२,०००/- |
| १२. | अभिप्राय व कायदेशीर सल्ला देणेकरीता | | | एकूण रक्कम २,०००/- |
| १३. | Cases pertaining to Courts beyond Vasai, Thane, Palghar, Mumbai Juridiction | | | एकूण रक्कम १२,०००/- + प्रवास खर्च |
| १४. | लोक आयुक्त न्यायालय | | | एकूण रक्कम ५,०००/- |
| १५. | न्यायालयीन प्रकरणामध्ये साक्षांकित प्रती काढणे | | | एकूण रक्कम ५००/- |
| १६. | लीगल नोटीस तयार करून बजावणेकरीता | | | एकूण रक्कम १,५००/- |
| १७. | साधी/मायनर नोटीस तयार करून बजावणेकरीता | | | एकूण रक्कम १,०००/- |

# अर्जाचा नमुना (APPLICATION FORM)

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील "वकील" ☐ / "सिनियर काऊंसिल" ☐ नियुक्तीसाठी अर्ज

(FOR EMPANELMENT AS "ADVOCATE" ☐ / "SR. COUNSEL" ☐ ON LAW PANEL OF VVCMC)

प्रति,
मा.आयुक्त साहेब,
वसई-विरार शहर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय, विरार (पूर्व),
ता.वसई, जि.पालघर, पिन कोड – ४०१ ३०५.

| Affix Photograph |
|---|

१. **संपूर्ण नांव मराठी व इंग्रजी (**FULL NAME IN ENGLISH)

| संपूर्ण नांव | मराठी | ENGLISH (IN CAPITALS) |
|---|---|---|
| आडनांव (SURNAME) | | |
| स्वतःचे नांव (NAME) | | |
| वडिलांचे/पतीचे नांव (FATHER/SPOUSE) | | |
| आईचे नांव (MOTHER) | | |

२. **रहिवासी पत्ता** (RESIDENTIAL ADDRESS)

| मराठी | ENGLISH (IN CAPITALS) |
|---|---|
| ………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>……………………………… पिन कोड ………………… | ………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>……………………………… PIN CODE ……………… |

३. **कार्यालयाचा पत्ता** (OFFICE ADDRESS)

| मराठी | ENGLISH (IN CAPITALS) |
|---|---|
| ………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>……………………………… पिन कोड ………………… | ………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>……………………………… PIN CODE ……………… |

**४. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता** (ADDRESS FOR COMMUNICATION)

| मराठी | ENGLISH (IN CAPITALS) |
|---|---|
| ………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>……………………………… पिन कोड ………………… | ………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>………………………………………………………………<br>……………………………… PIN CODE ……………… |

५. संपर्क / दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक (CONTACT NO.) : …………………………………………………………………

६. ई-मेल (E-MAIL) : ……………………………………………………………………………………………………

७. जन्म दिनांक (DATE OF BIRTH) : ………………………………………… वय वर्षे (AGE YEARS) : ....................

८. बार काऊंसिल नोंदणी क्रमांक (BAR COUNCIL REGISTRATION No.) : ……………………………………………..

९. शैक्षणिक अहर्ता (EDUCATIONAL QUALIFICATIONS) :

| **अ.क्र.** Sr.No. | **उत्तीर्ण झालेली परीक्षा** Examination Passed | **विद्यापीठ / मंडळाचे नांव** University/Board | **उत्तीर्ण वर्ष** Passing Year | **टक्केवारी / श्रेणी** Percentage/Grade |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |

१०. कामाचा अनुभव (WORK EXPERIENCE) :

| अ.क्र. Sr.No. | संस्थेचे नांव व पत्ता Name & Address of the Firm | कालावधी (Duration) | | एकूण अनुभव Total Experience |
|---|---|---|---|---|
| | | पासून (From) | पर्यंत (To) | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

११. **अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडलेल्या आहेत (Following Xerox True Copies are attached)**

(१) शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र व गुणपत्रिका (Educational Qualification Certificates and Marksheet) ☐

(२) बार काऊंसिल नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र, सनद (BAR Council registration certificate, ID, Sanad) ☐

(३) शाळा सोडल्याचा दाखला / जन्म प्रमाणपत्र (School Leaving Certificate / Birth Certificate) ☐

(४) पॅन कार्ड व आधार कार्ड (PAN Card and ADHAAR Card) ☐

(५) महानगरपालिकेने मंजूर केलेले दरसूची व अटी शर्ती मान्य असलेबाबत त्याखाली संमती दर्शविणारी स्वाक्षरी ☐
(Acceptance Signature showing consent for terms & conditions and rates fixed by Municipal Corporation)

(६) कामाच्या अनुभवाचा दाखला (Work Experience Certificate) ☐

(७) इतर कागदपत्र (असल्यास कृपया उल्लेख करावा) Other Documents (if any) kindly specify ………………………

……………………………………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………………………………

१२. राष्ट्रीयत्व (NATIONALITY) : ..........................................................................................................................

१३. अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय? (IS APPLICANT DOMICILED IN MAHARASHTRA?) **:** होय / नाही

१४. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील वकील / सिनियर काउंसिल म्हणून खालीलपैकी कोणत्या न्यायालय / न्यायाधिकरण करीता अर्ज दाखल करीत आहात? (कृपया खालीलपैकी कोणतेही एक कोणत्या न्यायालय / न्यायाधिकरण निवडणे)

वकील ☐ / सिनियर काउंसिल ☐

- मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली ☐
- मा.उच्च न्यायालय, मुंबई ☐
- NCLT (National Company Law Tribunal) ☐
- मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय, वसई ☐

**[* टीप : कृपया जे लागू नसेल त्यावर काट मारावी** (strike out whichever is not applicable)**]**

मी असे प्रमाणित करतो की, वर नमुंद केलेली सर्व माहिती ही माझ्या माहिती समजुतीनुसार सत्य व बरोबर असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा तद् नंतर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन याची मला जाणीव व कल्पना आहे.

This is to certify that, abovementioned details are true and correct to the best of my knowledge & belief. I am fully aware that, in the event if found false or incorrect, my nomination liable to be cancelled at any stage of selection or thereafter and I will be liable for legal action.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी .........................................

PLACE :- Signature ………….......……………………..

दिनांक :- नांव …………...………………………………

DATE :- Name …....…………...……………………….